



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १८३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.१३ फेब्रुवारी २०२५

## थोडक्यात

### स्वच्छ भारत अभियानाचा बोजवारा उडाला




**अक्षराज : दत्ता हामंद**

**दि.१२, कुंडलवाडी (नांदेड) :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियानाला सुरूवातीला देशभरात सकारात्मक प्रतिसाद मिळाला तर आता शहरांना त्यांच्या स्वच्छता विषयक प्रयत्नांमध्ये मदत करण्यासाठी इतर साधनांचा (टूल्सचा) शुभरंभही झाला असून स्वच्छ सर्वेक्षण २०२५ करीता काऊंटडाऊनही सुरू झाले असतानाच कुंडलवाडी मुख्य बाजारपेठेतील ही स्वच्छतागृह शौचालय धूळखात मृत अवस्थेत पडलेले आहे. कारण त्यात कुठल्याही प्रकारची स्वच्छता नसून पाणीसाठा नसल्याने, शौचालयगृहाची दरवाजे तुटलेले अवस्थेत असल्याने फक्त नावापूर्ती ही इमारतीची बांधणी झालेली आहे. कुंडलवाडी शहरालगत अनेक खेडी आहेत तसेच कुंडलवाडी शहरात मुख्य आठवड्यातून दोन वेळा बाजारपेठ भरत असते पण महिला भगिनी तसेच ज्येष्ठ नागरिक यांना कुठेच शौचालय उपलब्ध नसल्याने त्याचे हाल होत आहेत. तरीही नगरपरिषद चे प्रभारी मुख्याधिकारी याकडे लक्ष देतील का? हा प्रश्न सोडवतील का? याकडे कुंडलवाडीतील नागरिकांचे लक्ष लागलेले आहे मात्र यावरून स्वच्छ भारत अभियानाचा बोजवारा उडवल्याचे चित्र काही भागात दिसत आहेत.

### १२८ थकबाकीदारांच्या मालमत्तांची जप्ती

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, नवी मुंबई :** मालमत्ताकराचे थकबाकीदार असलेल्या व्यक्ती, संस्था यांना आवाहन करूनही तसेच नोटीस बजावूनही त्यांच्यामार्फत प्रतिसाद न देणाऱ्या १२८ थकबाकीदारांवर नवी मुंबई महापालिकेने मालमत्ता जप्तीची कारवाई केली. यामधील ३० थकबाकीदारांनी नोटीस मिळाल्यानंतर आपली थकबाकी व मालमत्ताकर जमा केला असून त्यापोटी महानगरपालिकेकडे ७ कोटी ४८ लक्ष इतकी रक्कम जमा करण्यात आलेली आहे.

पालिकेच्या मालमत्ता विभागाने केलेल्या कारवाईमध्ये अमेय को-ऑप.हौ.सोसायटीमधील ३ थकबाकीदारांनी थकीत मालमत्ताकर भरणा करणेबाबत बजावलेल्या नोटिशीकडे दुर्लक्ष केल्याने या तिन्ही मालमत्ता टाळे लावून सीलबंद करण्यात आल्या. महापालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार १ लाखापेक्षा अधिक रक्कमेचे थकबाकीदार असणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांची उतरत्या क्रमाने यादी तयार करण्यात आली होती. यामधील ८ हजार मोठ्या थकबाकीदारांना थकबाकी भरण्यासाठी ७ दिवसांची मुदत देऊन नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. या नोटीसांनाही प्रतिसाद न देणाऱ्या १२८ थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात आल्याची माहिती मालमत्ता कर विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांनी दिली.

# लाडकी बहीण योजनेबाबत देवेंद्र फडणवीस म्हणाले...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या वेळी महायुती सरकारने आणलेली लाडकी बहीण योजना चांगलीच चर्चेत राहिली. महिलांना दरमहा १५०० रुपये देणारी ही योजना आहे. ही योजना बंद होणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. तसंच या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर किती भार पडला आहे हेदेखील स्पष्ट केलं. तसंच ज्या अपात्र महिलांनी निधी घेतला आहे त्याबाबतही महत्त्वाचं विधान देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

**लाडकी बहीण योजनेबाबत काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?**

लाडकी बहीण योजना सुरु केल्यानंतर ४० ते ४५ हजार कोटींचा भार बजेटवर आल्याने फिस्कल स्पेस कमी झाली आहे. मात्र लाडकी बहीण योजना बंद करणार, ही योजना बंद करणार, ती योजना बंद करणार आम्ही कुठलीही योजना बंद केलेली नाही. ज्या योजना सुरु आहेत त्या चालवणारच आहोत. मी हेदेखील अधिकाऱ्यांना सांगितलं की रिव्हर्स गणित मांडा की आपली प्रगती करण्यासाठी किती गुंतवणूक करायची आहे? किती करु शकतो? २५ हजार कोटींचा फरक पडत असेल तर ते आपण केंद्राकडून विविध योजनांमधून आणता येईल का? याचा विचार आम्ही करतो आहोत. इतर कुठल्या योजनांच्या माध्यमांतून निधी उभा राहिल हे आम्ही पाहतो आहोत. महसुली तूट वाढते आहे म्हणून भांडवली खर्च कमी करायचा या ट्रॅपमध्ये आम्हाला जायचं नाही असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**ज्या अपात्र बहिणींनी निधी घेतला आहे काय म्हणाले मुख्यमंत्री?**

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन थाळी आणि शिवभोजन थाळी या योजनाही बंद करण्याचं कारण नाही. अनेकदा बातम्या आल्यावर आम्हाला कळतं की असा काही निर्णय आम्ही घेणार आहोत. परवाच गयेला ट्रेन्स गेल्या, अयोध्येला ट्रेन्स गेल्या. कुठलीही योजना आम्ही बंद करणार नाही. या योजनांच्या संदर्भात आम्ही आढावा घेणार आहोत. लाडकी बहीण योजनेत



अनेक अपात्र बहिणींनी लाभ घेतला आहे. साधारणतः १० लाख ते १५ लाख एवढी ही संख्या जाऊ शकते. त्यातल्या अनेक बहिणींनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणं सोडणं सुरु केलं आहे. आम्ही ज्या अपात्र बहिणी आहेत त्यांना आम्ही यापुढे योजनेचा लाभ देणार नाही. कारण आम्ही यासाठी कॅगला उत्तरदायी आहोत. कारण कॅगकडून विचारणा झाल्यानंतर आम्हाला त्याचं उत्तर द्यावं लागतं. अशा प्रकारे यापुढे घडू नये म्हणून अपात्र महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ यापुढे मिळणार नाही. मात्र आत्तापर्यंत जो निधी त्यांना मिळाला आहे तो आम्ही परत मागणार नाही. तो निधी त्यांच्याकडेच राहिल. मात्र पात्र महिलांनाच पैसे गेले पाहिजेत यासाठी आम्ही आग्रही आहोत. असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

**मंत्रालयात काहींना दलालीची सवय लागली आहे-फडणवीस**

मंत्रालयात काही लोक पर्मनंट पीए आहेत. काही लोक चांगलेही आहेत. काही लोकांना पीएचं काम करताना दलालीची सवय लागली. त्यामुळे अशा दलालांना बाजूला केलं पाहिजे म्हणून मी सांगितलं की आम्ही सगळी पडताळणी करु आणि त्यानंतर त्या संदर्भातली मान्यता देऊ असं वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. तसंच मी अधिकाऱ्यांना १०० दिवसांचा कार्यक्रम दिला आहे. सरकारी कार्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची आवश्यकता असली पाहिजे. तसंच अधिकारी कुठल्या वेळेस उपलब्ध असतील ? हे देखील समजलं पाहिजे, अशा सात गोष्टी मी अधिकाऱ्यांना सांगितलं आहे. असंही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही वेळापूर्वीच सकाळ वृत्त समूहाच्या कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली होती. यावेळी त्यांची मुलाखत पार पडली. या मुलाखतीत त्यांनी हे भाष्य केलं आहे.

# विजयनगरच्या प्रलंबित मागण्यांसाठी ग्रामस्थांचा पंचायत समिती येथे धडक मोर्चा

**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१२, जव्हार (पालघर) :** विजयनगर हे गाव जव्हार व विक्रमगड या दोन्ही तालुक्यात विभागला गेल्याने आज पर्यंत या ठिकाणचा विकास होऊ शकला नाही. त्यासाठी विजयनगर येथील ग्रामस्थांनी नुकतीच पंचायत समिती विक्रमगड येथे येऊन आपले प्रलंबित प्रश्न मांडले.

यावेळी पंचायत समिती विक्रमगड सभागृहात यशवंत कनोजा सभापती पंचायत समिती विक्रमगड .विजया दैनात लहारे सभापती पंचायत समिती जव्हार, दैनात लहारे सामाजिक कार्यकर्ते,मनोज बोरसे ,सुभाष भोये सदस्य पंचायत समिती विक्रमगड,गटविकास अधिकारी पंचायत समिती विक्रमगड सर्व कर्मचारी उपस्थित होते.



जव्हार तालुक्याचे विभाजन झाले व स्वतंत्र विक्रमगड तालुक्याची निर्मिती करण्यात आली. खुडेद ग्राम पंचायतीचा समावेश विक्रमगड तालुक्यात करण्यात आला. खुडेद ग्रामपंचायत मध्ये महाले पाडा,मशेपाडा,धोडीचा पाढा,तिवस पाडा,गारमाळ,कुंडाचा पाडा,झापपाडा,टोकरे पाडा या पाड्यांचा समावेश करण्यात आला. या पाड्यांचा महसूल गाव खुडेद ग्रामपंचायत मध्ये आहे व बिरारी पाडा, बोरसेपाडा,माऊली पाडा बरफ पाडा,जाधव पाडा या पाड्यांचा महसूल गाव विजयनगर आहे. खुडेद महसूल गावाचा तालुका विक्रमगड आहे आणि विजयनगर महसूल गावाचा तालुका जव्हार हा आहे. मात्र दोन्ही महसूल गावांची ग्रामपंचायत खुडेद ही एकच आहे ती विक्रमगड तालुक्यात आहे. विजयनगर महसूल गाव मधील बिरारी पडा व माऊली पाडा हे दोन पाडे जव्हार तालुक्यात ऑनलाइन आहेत.

याचा परिणाम येथील ग्रामस्थांना भोगावा लागत आहे. येथील ग्रामस्थांचे शासकीय कामे,शासकीय योजना, शेती संदर्भात योजना,रोजगार,मुलांची शैक्षणिक कागदपत्रे काढणे हे करताना अनेक अडचणी येतात. येथील नागरिक जर जव्हार येथे तालुक्यात गेले तर तेथील अधिकारी सांगतात की तुमचे ग्रामपंचायत विक्रमगड तालुक्यात आहे तुमची कामे तिकडे होतील व जर का विक्रमगड तालुक्यात गेलो तर तेथील अधिकारी सांगतात तुमचे महसूल आणि तालुका जव्हार आहे तुमची कामे तिकडे होतील. या कारणामुळे येथील गाव पाड्यांचा विकास खुंटला आहे असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

सद्यस्थितीत खुडेद ग्रामपंचायत मध्ये घरकुल योजनेच्या 'ड' यादीनुसार फक्त महसूल गाव खुडेद साठी घरकुल योजना राबवली जात आहे .महसूल गाव विजयनगर हा घरकुल योजनेपासून पूर्ण वंचित आहे. आज पर्यंत एकही व्यक्तीला घरकुल योजनेचा लाभ मिळाला नाही. अशी येथील ग्रामस्थांची तक्रार आहे.

तरी याबाबत तातडीने उपाययोजना करून येथील ग्रामस्थांच्या अडचणी सोडवाव्यात अशी मागणी विजयनगर येथील ग्रामस्थांनी पंचायत समिती विक्रमगड येथे केली आहे.

# युवकांची आत्महत्या अन् बारावीच्या विध्यार्थ्याचा गळफास

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, बुलडाणा :** दोन आत्महत्याच्या घटनांनी नांदुरा आणि मलकापूर नगरी हादरली. नांदुरा येथे बारावीच्या विध्यार्थ्याने गळफास घेत तर मलकापूर येथे एका युवकाने रेल्वे गाडीसमोर स्वतःला झोकून देत आत्मघात केला.

बारावीची परीक्षा सुरू होण्याच्या पुर्व संध्येला १० फेब्रुवारी रोजी रात्री साडेनऊ च्या सुमारास कल्पेश हरिष भुतडा (वय १८) याने राहत्या घरात आत्महत्या केल्याचे आढळून आले. वडील हरिष भुतडा यांचे रेडीमेड कपड्यांचे दुकान आहे. कल्पेश अभ्यासात हुशार होता.म्हणजे आर्थिक अडचण नव्हती आणि सपशेल नापास व्हायची भीती नव्हती. तरीही त्याने नॉयलॉन दोरीने गळफास घेत जीवनयात्रा संपविली.त्याने हे टोकाचे पाऊल संभाव्य अपयशाच्या, जास्त वा अपेक्षित टक्केवारी मिळणार नाही या धास्तीने उचलले का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. यामुळे शहरातील पालकांसह समाजमन सुन्न झाले आहे.

**'ते' हेलावणारे दृश्य!**

वडील संध्याकाळी दुकान वरुन घरी आले असता त्यांनी कल्पेश कुठे आहे असे विचारले असता तो त्याच्या खोलीत अभ्यास करीत असल्याचे समजले. वडील त्याला जेवायला बोलावण्यासाठी गेले असता खोलीचा दरवाजा आतून बंद केल्याचे त्यांना दिसले. वडीलांनी त्याला आवाज दिला. मात्र आतुन कुठलाच प्रतिसाद मिळत नसल्याने वडिलांनी खोलीच्या मागील बाजूस असलेल्या खिडकीतून डोकावून पाहिले असता आतील दृश्य पाहून त्यांना धक्काच बसला. कल्पेश याने नायलॉन दोरीने गळफास लावून आत्महत्या केल्याचे दिसून आले. मुलगा हुशार असल्याने कल्पेश ची आई आणि आजी प्रयागराज येथे कुंभमेळ्यासाठी गेले होते. आल्यावर मुलगा आणि नातुचा मृतदेह पाहल्यावर त्यांच्यावर काय बेतले हे त्यांनाच ठाऊक? समंजस असलेल्या कल्पेश ने आपल्या कृतीने कुटुंबावर होणाऱ्या परिणामाचाही विचार केला नाही का? बारावी म्हणजे जीवन आहे असे समजले का? असे अनेक प्रश्न या घटनेने उपस्थित केले आहे

**तीन दिवस स्थानकावर फिरत राहिला अन...**

मलकापूर येथील रेल्वे स्थानक येथे महाराष्ट्र कोल्हापूर एक्सप्रेस समोर उडी घेऊन एका युवकाने केलेली आत्महत्या अशीच चिंतनास भाग पाडणारी होय. या २५ वर्षीय युवकाने ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर शेकडो प्रवाश्या समोर आपले जीवन संपविले.

या घटनेने प्रवाशांच्या जीवाचा थरकाप उडाला! महिला, युवतीच्या आर्त आवाजानी स्थानक परिसर शोकाकुल झाला.

आत्महत्या केलेल्या युवकाची ओळख पटली नसुन आत्महत्या करणारा युवक गेल्या तीन दिवसापासून प्लॅटफॉर्मवर फिरताना दिसत होता. त्याने हे टोकाचे पाऊल का उचलले हा प्रश्न हजारो प्रवाशीयांच्या मनात रेंगाळत राहिला.

# वाळूच्या अवैध उत्खननामुळे गुंडगिरी वाढते, पंकजा मुंडेंची कबुली

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, नागपूर :** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण गाजत आहे. या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड व त्यांच्या साथीदारांचा बीड जिल्ह्यातील अवैध वाळू उत्खननातही सहभाग असल्याचा आरोप होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण मंत्री व बीड जिल्ह्यातील भाजप नेत्या पंकजा मुंडे यानी नागपुरात याबाबत महत्त्वपूर्ण विधान केले आहे. एका खासगी कार्यक्रमासाठी मुंडे बुधवारी रात्री नागपुरात आल्या असता माध्यमांशी बोलत होत्या.

वाळू उत्खननासाठी आमच्या विभागाची पर्यावरणीय परवानगी लागते. मात्र तो विषय प्रामुख्याने महसूल विभागाचा आहे. वाळू उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याकडे आम्हाला लक्ष द्यावे लागते. यासंदर्भात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत झाली आहे. अवैध वाळू उत्खननामुळे सरकारचे मोठे आर्थिक नुकसान होते. सोबतच स्थानिक पातळीवर गुंडागर्दी ही वाढते. मात्र वाळूचे मर्यादित उत्खनन करणे आवश्यक आहे, कारण त्यामुळे नदी पात्राचे खोलीकरण होते, पाणी जमिनीत मुरते त्यामुळे वाळू उत्खननाच्या संदर्भात समतोल साधणे आवश्यक आहे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

**नद्यांचे पुनरूज्जीवन !**

नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी आम्ही लोकांशी भेटत आहोत. लोकांकडून येणाऱ्या सूचनानुसार लवकरच नवीन नियोजन राज्यसमोर सादर करू, असे मुंडे यांनी सांगितले. नद्या दुर्लक्षित आहे, त्यांची जबाबदारी कोणीही घेत नाही. नदी राज्याची आणि देशाची संपत्ती आहे म्हणून आम्ही त्यांच्या पुनरुज्जीवनासाठी नियोजन करत आहोत, असे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# संपादकीय

## रोहिदास महाराजांचे विचार आजही अनुकरणीय...

संत शिरोमणी गुरुदेव श्री रविदास महाराज यांचा जन्म १४ व्या शतकातला. आज त्यांची ६४८ वी जयंती आहे. समाजाच्या बऱ्याच मोठ्या घटकावर जातीच्या नावाखाली हजारो वर्षे अन्याय झाला. अशा सर्व समाजांच्या उद्धारासाठी संत रविदास महाराजांनी काम केले. त्यांना स्वतःलादेखील या अन्यायाविरुद्ध संघर्ष करावा लागला. भारतीय इतिहास आणि साहित्यात संत रविदासांचे महत्वाचे स्थान आहे. त्यांनी शोषित-पीडित-वंचित-दलित जनतेच्या आकांक्षांना आपल्या रचनांमधून अभिव्यक्त केले. सामाजिक न्याय, सामाजिक समता आणि सर्वधर्म समभाव त्यांच्या वाणीचा मूळ स्वर आहे. त्यामुळे आजच्या काळात त्यांचे महान कार्य समजून घेणे खूप महत्वाचे आहे. संत रविदासांनाच संत रैदास किंवा महाराष्ट्रात जास्त प्रचलित संत रोहिदास महाराज म्हणून संबोधले जाते.सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

शोषितांच्या शिक्षणासाठी कार्य

अविधा अहित कीन,
ताते विवके दीप भया मलीन ।

त्याकाळी तथाकथित उच्च जातीतील पुरुष सोडले तर बाकीच्या तथाकथित खालच्या जातींना तसेच उच्च जातींतील स्त्रियांनासुद्धा शिकण्याचा अधिकार नव्हता. या अविद्येमुळे समाजाचे मोठे अहित (नुकसान) झाले. अशा समाजाच्या शिक्षणासाठी रविदास महाराजांनी प्रयत्न केले.

सामाजिक गुलामीतून मुक्त होण्याचे आवाहन

पराधीन पाप है, जान लेवो रे मीत ।
रैदास दास पराधीन को, कौन करे परीत ।।

उच-निचतावादी समाजव्यवस्थेने लादलेल्या मानसिक गुलामीतून (पराधिनतेतून) सर्व शोषितांना मुक्त होण्याचे आवाहन महात्मा रविदासांनी केले. अंगमेहनत करून खाणाऱ्यांनी स्वतःला कसल्याही बाबतीत कमी न समजता, अभिमानाने जगावे, असा संदेश त्यांनी दिला.

जातीप्रथेवर आसूड

जाति जाति में जाति हैं, जो केतन के पात ।
रैदास मनुष ना जुड़ सके जब तक जाति न जात ।।
जात पांत के फेर मंहि, उरझि रहइ सभ लोग।
मानुषता कूं खातइह, जात कर रोग ।।

संत रविदासांनी जातीप्रथेवर कडाडून टीका केली आहे. त्यांनी समाजातील जातीव्यवस्थेचे वर्णन करताना केळीच्या (केतन) झाडाचे उदाहरण दिले आहे. रविदास महाराज म्हणतात, की जर केळीच्या झाडाला सोलले तर त्यात पानच्या आत पानच मिळत जाते, शेवटी आत काही मिळत नाही. त्याचप्रमाणे आपल्या जातीच्या खाली जात, जातीच्या वर जात मिळत जाते, पण यामुळे माणूस मात्र मिळत नाही. जातीप्रथा माणसाला संपवून टाकते. म्हणून संत रविदास म्हणतात, जोपर्यंत जाती जाणार नाही तो पर्यंत माणूस जोडला जाणार नाही.

सर्वधर्मसमभावाची शिकवण

राघो क्रिस्न करीम हरि, राम रहीम खुदाय ।
'रविदास' मेरे मन बसहिं, कहुं खोजहूं बन जाय ।।
हिंदू तुरुक (मुसलमान) मंहि नहीं कुछ भेदा, सभ मंह एक रत्त अरु मासा।
दोऊ एकहू दूजा कोऊ नांहि, पेख्यो सोध 'रविदासा' ।।
मुसलमान सों दोसती, हिंदुअन सों कर प्रीत ।
'रविदास' जोति सभ राम की, सभ हैं अपने मीत ।।

महात्मा रविदासांनी त्यांच्या वाणीतून सर्व ईश्वरसमान आहेत आणि ते माणसाच्या मनातच वास करतात असा संदेश दिला. त्यासोबतच सर्व धर्मदेखील समान आहेत आणि सर्व धर्मांची माणसेसुद्धा समान आहेत, त्यांनी एकोप्याने, प्रेमाने राहिले पाहिजे असे आवाहन केले. आज तब्बल सहाशे वर्षांनंतरही महाराजांचे विचार तितकेच समर्पक आहेत.

समतेवर आधारित राज्यव्यवस्थेची अपेक्षा

ऐसा चांहू राज मैं मिलै सबन को अन्न ।
छोटे बड़े सम बसे, रैदास रहै प्रसन्न ।।

सर्वांना स्वतःचा सर्वांगिण विकास करता आला पाहिजे, त्यासाठी लागणाऱ्या संधी राज्यव्यवस्थेने पुरवल्या पाहिजेत. तसेच समाजात कसल्याही प्रकारचा उच-निच भेदभाव नसला पाहिजे. अशा राज्यव्यवस्थेची अपेक्षा संत शिरोमणी रविदास महाराज यांनी केली आहे.

समतेचा संदेश देणाऱ्या पवित्र ग्रंथ
'गुरू ग्रंथ साहिब' मध्ये महात्मा रविदासांच्या ४१ रचनांचा समावेश आहे.

# " व्हेलंटाईन डे " चं बंधन कशाला ?



- दिलीप देशपांडे
जामनेर, ८९९९५६६९१७

प्रेम हे असे शब्द आहे आणि भावना आहे की त्यामुळे आयुष्यात आनंदाला बहर येतो. प्रेमाला वयाच, नात्याचं, जातीचं, असं कुठलेच बंधन नाही.नसते. त्याला असं दिवसाच बंधन घालणे योग्य नाही। फक्त हवे निस्वार्थी प्रेम. अगदी ३६५ दिवस प्रेम करा. पण झालंय काय...

वर्षात आपण बरेच काही दिन-दिवस-आणि डेजसाजरे करत असतो. त्यातही काही डेज ची विशेष वाट बघितली जाते.जसे फ्रेन्डशिप डे, व्हेलंटाइन डे.आपली मित्रत्वाची भावना, प्रेमाची भावना प्रकट करायला त्या त्या दिवसाची वाट बघावी लागते हीच मोठी शोकांतिकाआहे,असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. तरीही एकमेकांवर प्रेम असणं,आवश्यक आहे.ते नाकारता येत नाही. प्रेमाने सगळं साध्य होत, ते खोट नाही. प्रेम ही अशी भावना आहे जी व्यक्त झाल्यावर चेहरा खुलतो, बहर येतो, आणि खरंतर तसं पाहिलं तर ती भावना व्यक्त करण्यासाठी कुठल्याही ठरावीक वेळेची, जागेची, आणि दिवसाची गरज नसतेच मुळे आणि नसावी ही.

फेब्रुवारी महिना लागला की तरुण युवक -युवती मध्ये १४

फेब्रुवारीच आकर्षण असत ते व्हेलंटाइन डे च.

आताशात अनेक विवाहितां मध्येही ते असल्याचे दिसते.

मग कुठे जायचं, कुठे भेटायचं, गिफ्ट काय घ्यायच,जेवणाचा कार्यक्रम कुठे? सगळं ठरत असत.

पण हा प्रेम व्यक्त करण्याचा दिवस व्हेलंटाइन डे म्हणून साजरा का केला जातो? का करतो, ह्या विषयी कोणालाही काही माहिती नसते.

सगळ्यांनाच माहीत व्हावा म्हणून व्हेलंटाइन डे विषयी जाणून घेऊ.

रोम मध्ये क्लाडिअस नावाचा राजा होता. तो शिस्तप्रिय, कठोर होता.तसा क्रुरही होता. त्याची काही तत्व होती, ती वेगळी होती. त्याच्या मते प्रेम आणी लग्न माणसाला कमजोर करतात. कामावरून त्यांच लक्ष उडत. युध्दात चांगले लढू शकत नाही. कुटुंबाची चिंता असते. त्याने आपल्या सैनिकांना प्रेम, लग्न न करण्याचा फतवा काढला होता. अर्थातच तो सर्वात मान्य नव्हता. त्याच राज्यात एक संत रहात होते. त्यांच नाव व्हेलंटाइन होते. जनतेवर हा अन्याय आहे. तो त्यांना मान्य नव्हता. आणि म्हणूनच त्यांनी काही प्रेमिकांची लपूनछपून लग्न लाऊन दिली होती.अर्थातच ही गोष्ट लपून राहणे शक्यच नव्हती. राजाच्या कानावर गेलीच. आपल्या आदेशानुसार न झाल्याने, व्हेलंटाइनला मृत्यूदंड देण्यासाठी आदेश दिला.कारागृहात त्याची रवानगी झाली.

कारागृहात जेलरच्या मुलीची दृष्टी त्यांनी परत आणून दिली. त्यामुळे मुलीत आणि त्यांच्यात जवळीक झाल्याने, प्रेम निर्माण होते. व्हेलंटाइन मृत्यदंडाचे आधी एक प्रेमपत्र तिला लिहितो. आणि निरोप घेतो. त्यात तुझा व्हेलंटाइनम्हणून सांगता करतो.तोच हा १४ फेब्रुवारीचा दिवस त्याचे नावे साजरा होतो. सगळयांनाच सविस्तर माहीत व्हावे हा उद्देश.

भारतात ही मोठया प्रमाणात प्रेमीं कडून हा दिवस साजरा होतो. आपल्या प्रिय व्यक्तीला, शुभेच्छा पत्र, गुलाब पुष्प, भेट वस्तू देऊन आपल्या प्रेमभावना व्यक्त करतात. करायला हव्यात.

प्रेमी कोण? सर्वच असतात. प्रत्येकाचे मनात कोणा न कोणाबद्दल प्रेम हे असतच.मनात प्रेमभावना नाही अशी व्यक्ती सापडणे नाही.

आनंदात असणे प्रेम असते. आनंदाने, हसणे, हसवणे प्रेम असते.

गुलाबाचे फुल देणे हेसुद्धा प्रेम असते.

एकमेकांना जपणं हे पण प्रेम असते. एकमेकाला नेहमी सावरणं हे पण प्रेम असते.

मित्र-मित्रात, मित्र-मैत्रिणीमध्ये, पति-पत्नी मध्ये, प्रियकर -प्रेयसी मध्ये आई-वडील -मुलामध्ये. प्रेम असत. अर्थातच प्रत्येकाची प्रेमाची भावना निराळी असते.अपेक्षा निराळ्या असतात. प्रेमाला वयाच बंधन नसत.

आपल्यावर कोणी प्रेम करतय, आपल कोणावर तरी प्रेम आहे, ही भावनाच अतिशय सुखद असते,मनाला आनंद देणारी असते.आपल्या जगण्याला बळ देणारी असते.

**आवडल कोणी**
**तर वेड होऊन जावं**
**बेधुंद होऊन प्रेम करावं**
**फुला सारखं जपावं**
**प्रेमासाठी जगणं व्हावं**
**वेड होऊन प्रेम करावं....**

पण आज सगळ्याच गोष्टींचे अर्थ बदलत चालले आहे.प्रेम म्हणजे नक्की काय? की आकर्षणातून दोघे जवळ येतात. हे हि महत्त्वाचे ठरते.अनेकदा दोघे, फेसबुक,वॉटसाप, इन्स्टाग्राम माध्यमातून जवळ येतात.काही वेळा नको इतकी जवळीक साधली जाते,आणि नको ते प्रसंगाना सामोरे जावे लागते. आत्महत्या, हत्या, असे अनेक प्रसंग येतात.. आयुष्य उद्धस्त होतात... हे नकोय. मैत्रीतून एक सुंदर नातं निर्माण व्हावं. विचारांची देवाणघेवाण व्हावी. पण बऱ्याचदा तसे होत नाही आणि म्हणूनच व्हेलंटाइन डे ला अनेकांन कडून विरोध होतो, तो यामुळेच.

आता तर पूर्ण आठवडाच व्हेलंटाइन डे आठवडा साजरा करण्याचा प्रघात आलाय. रोज डे, प्रपोज डे, चॉंकलेट डे, टेडी डे, प्रॉंमिस डे, हग डे, किस डे, आणि व्हेलंटाइन डे, असा आठवडा. आपल्या प्रियकराला गुलाब पुष्प देणे, भावना व्यक्त करणे, वचन देणे, चॉंकलेट, भेटवस्तू देणे, मिठी मारणे, किस करणे, असे प्रकार येतात, जे आपल्या संस्कृतीत नाही बसत ह्या सगळ्या गोष्टी. म्हणूनच विरोध होतो. खरं प्रेम व्यक्त करायला ह्या सगळ्याची आवश्यकता आहे का? हा प्रश्न.का उगीचच असे प्रकारातून आपल प्रेम जगाला दाखवायचे. संधी साधू प्रेम नकोय. प्रेम जरूर करा ,प्रेमात, आणि प्रेमाने सगळं व्यवस्थित चाललय.प्रेम शब्दाला कमीपणा येईल असे कृत्य करू नका.. प्रत्येकाने प्रेमात रहा,.. आणि हा दिवस प्रेम व्यक्त करण्याचा प्रेमाचा दिवस म्हणून साजरा करा. संयमाने. एकच दिवस नाही तर सतत प्रेमात रहा... रोजचाच दिवस प्रेममय असूद्या...

**पाडगावकर आपल्या कवितेत म्हणतात --**

**प्रेम कधी रुसणं असतं,**
**डोळ्यांनीच हसणं असतं,**
**प्रेम कधी भांडत सुध्दा !**
**दोन ओळींची चिठ्ठीसुध्दा प्रेम असतं,**
**घट्टमिठी सुध्दा प्रेम असत**
**मग सांगा,**
**प्रेम म्हणजे नक्की काय असतं.?**
**प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे काय असतं ?**
**प्रेम म्हणजे.. प्रेम.. असतं.**
**पण**
**प्रत्येकाच् असतं का सेम.?**

## कु. सृष्टी शिदच्या मृत्यू प्रकरणी चिरनेर आश्रमशाळेतील मुख्यध्यापक, अधीक्षक व शिक्षकांवर गुन्हे दाखल

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१२, माथेरान :** पनवेल तालुक्यातील तामसई येथील कु. सृष्टी राजू शिद ही उरण तालुक्यातील चिरनेर आदिवासी आश्रमशाळेत इयत्ता तिसरीच्या वर्गात शिकत होती. अचानक तिच्या पोटात दुखायला लागले. कु. सृष्टी आणि तिच्या मैत्रिणींनी आश्रमशाळेतील असणाऱ्या शिक्षकांना सांगितले.

मात्र, त्याकडे दुर्लक्ष केले. नंतर काही तासाने कु. सृष्टीला उपचारासाठी पनवेल येथे नेण्यात आले. उपचार चालू असताना मृत्यूची झुंज देत होती, शेवटी कु. सृष्टी शिदचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. आणि पिडीत कुटुंबाना धक्का बसला. आश्रमशाळेतील व्यवस्थापकीय मंडळीनी जर वेळेत कु. सृष्टीचा उपकार केला असता तर त्या चिमूकल्या मुलाचा जीव वाचला असता, असा पालकांनी आरोप करत शाळा व्यवस्थापकीय मंडळीवर गुन्हा दाखल करा.

यासाठी कु. सृष्टीचे आई वडील आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशन ला अनेक पत्र दिले. मात्र गुन्हा दाखल झाला नाही. शेवटी आई वडिलांनी मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ २ कार्यालयासमोर उपोषण करण्याचे पत्र दिले आणि मंगळवार (दि. ११ फेब्रुवारी) रोजी सकाळी ११ वाजता उपोषणाला



सुरुवात करताच मा. सहायक पोलीस आयुक्त व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दखल घेतली.

यावेळी आदिवासी समन्वय समिती रायगड जिल्हा अध्यक्ष, पत्रकार गणपत वारगडा, लक्ष्मण शिद, कु. सृष्टीचे आई वडील शोभा राजू शिद आणि त्यांचे नातेवाईकांसह तात्काळ उरण पोलीस स्टेशनमध्ये गेलो आणि सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास चिरनेर आदिवासी आश्रमाशाळेतील मुखध्याक आप्पासाहेब मोरे, अधीक्षक सतीश मोरे, शिक्षक महादेव डोईफोडेसह इतर शिक्षक आणि स्टाफवर भारतीय न्याय सहिंता (बी ना एस) २०२३ कलम १०६(१), ३(५), अल्पवयीन न्याय (मुलाची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ कलम ७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात उरण वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, पोलीस उप निरीक्षक संजय साबळे अधिक तपास करीत आहेत.

### कॉपी..

आता आलीयं जाग
वर्षभर गेलासं झोपी
परिक्षा थांबली दारा
धावपळ करी भोपी

छातीत करे धड धड
धडाडू लागेलं तोफी
डोक्या हजार विचार
हलायां लागली टोपी

जुळवा जुळवी चालू
कशी करायची कॉपी
पास व्हायचे झटपट
रे पध्दत वाटते सोपी

भासे चमत्कार घडो
मिळो जादूची झप्पी
ती अपेक्षित प्रश्नोत्तरे
गाईडची छापा छापी

उत्तरे शोधता हैराण
लागेलं प्रश्नांची थप्पी
रट्टे मारुन हे पाठांतर
नको बुवा हडेलहप्पी

केला नाही अभ्यास
कशी खेळे लपाछपी
वर्ष भर गंमत करता
केवढा आनंदी हॅपी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# कॉपीची कुप्रथा

आपल्याकडे फेब्रुवारी मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते ११ मार्च दरम्यान असून दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च दरम्यान होणार आहे.

या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी बारावीची परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी. दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले. मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला मात्र विद्यार्थी पंतप्रधानांचा हा संदेश कितपत अंमलात आणतील याबाबत शंकाच आहे कारण कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

दहावी बारावीच्या परीक्षेत तर कॉपीचा सुळसुळाट झालेला दिसून येतो. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना कॉपी पुरवण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉल च्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परीक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वोतोपरी प्रयत्न करतात हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबवले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रावर धाक बसवतात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही मात्र देशातील काही राज्यात कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठवण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपिला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात . त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते. कठोर मेहनतीशिवाय फळ मिळत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कॉपिसारख्या कुप्रथेला मूठमाती द्यावीच लागेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## दिव्यात दुचाकी-ट्रक आपघातात २४ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१२, दिवा (ठाणे) :** दिवा शहरात आगासन रोडवर मेट्रो हॉस्पीटल समोर काल दुपारी दुचाकी-ट्रक आपघातात २४ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दिवा शहरात राहणारा मंदार अशोक रायकर (वय २४) राहणार साबेगाव हा MH०४ KB १६१६ या दुचाकीने दिवा आगासन रोडवरून जात असताना मेट्रो हॉस्पीटलच्या आसपास दुपारी बारा वाजताच्या सुमारास दुचाकीवरील ताबा सुटल्याने MH०६ AC १८६३ या ट्रकच्या चाकाखाली आल्याने आपघात होऊन गंभीर जखमी झाला होता. प्रसंगी मंदार रायकर या तरुणास तातडीने हॉस्पीटलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. प्रकरणी सदर आपघाताचा मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलीसांनी ट्रक चालका विरोधात गुन्हा दाखल केला. पुढील तपास दिवा पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक अंबादास सावंत करत असून आपघात नक्की कसा झाला याचा तपास सुरु आहे.

## आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या बदलांच्या आव्हानांसाठी शिक्षकांना प्रशिक्षण



**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१२, जव्हार (पालघर) :** आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रांमध्ये होणाऱ्या बदलांच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षक यांना सक्षम करणे आवश्यक आहे. यासाठी अध्ययन अध्यापन व मूल्यमापन यांचा परस्पर संबंध व यानुसार होणारे मुलांचे अध्ययन तसेच वर्गामधील आंतरक्रिया या विषयांचे अद्यावत ज्ञान विद्यार्थ्यांना असणे आवश्यक आहे. तसेच या विषयाचे ज्ञान आणि कौशल्य शिक्षकांना आत्मसात व्हावीत आणि त्याचा वापर विद्यार्थ्यांना या जागतिक स्तरावरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी व्हावा. या उद्देशाने दिव्य विद्यालय जव्हार येथे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पालघर व शिक्षण विभाग पंचायत समिती जव्हार अंतर्गत तालुकास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन ५ टप्प्यांमध्ये करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षणाचा पहिला टप्पा दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ ते १५ फेब्रुवारी २०२५ रोजी दिव्य विद्यालय येथे संपन्न होत आहे. तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांना सदरील प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी पंचायत समिती सभापती विजयाताई लहारे यांनी शिक्षकांना प्रशिक्षणासाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. तसेच गटशिक्षणाधिकारी विजया टाळकुटे यांनी शिक्षकांना प्रशिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. दिव्य विद्यालयाच्या संस्थापिका प्रमिलाताई कोकड यांनीही शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी पुंडलिक चौधरी, मनीषा डांगे, किरण शिंदे, तसेच सर्व केंद्रप्रमुख व बीआरसी कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षणाचे नियोजन डायट पालघर व शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आलेले आहे. तर संतोष मुकणे हे प्रशिक्षण समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

## महापालिका मुख्यालयात संत रविदास जयंती निमित्ताने अभिवादन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, पनवेल :** महानगरपालिकेच्या मुख्यालयात बुधवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी गुरू रविदास यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, लेखा धिकारी संग्राम व्होरकाटे, सहाय्यक आयुक्त स्मिता काळे, माजी नगरसेवक शिवदास कांबळे, माजी नगरसेविका डॉ.सुरेखा मोहकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, कर्मचारी नागरिक उपस्थित होते.

## पोषक वातावरणामुळे गव्हाचे पीक जोमात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** गव्हाच्या पिकास पोषक वातावरण असल्यामुळे यावर्षी सुरवातीस नोव्हेंबर मध्ये केलेले गव्हाचे पीक जोमात असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत असून शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत असून पीक हातात येईपर्यंत निसर्गाने साथ दिली तर चांगले उत्पन्न मिळण्याची आशा शेतकऱ्यांना आहे. शेतकरी सोमनाथ बांडे यांनी चांगली मेहनत घेऊन गव्हाचे पीक जोपासले असून एकरी १६ ते २० क्विंटल उत्पादन मिळेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. अंकुर केदार या गव्हाच्या जातीची एकरी ४० किलो प्रमाणे दोन एकर क्षेत्रावर पेरणी केली. पेरणी करताना १८;४६ खताची एकरी २ बॅग (५० किलो प्रमाणे) दिली. २१ दिवसांनंतर वेस्टा या तणनाशकाची फवारणी केली. त्यानंतर दीड महिन्यानंतर डीएपीची फवारणी केली व युरीया खताची मात्रा तसेच शेवटी पोट्याश खताची मात्रा देऊन गरजेनुसार पाण्याच्या ६ पाळ्या दिल्या. आता गव्हाची वाढ होऊन चांगली ओंबी लागली असून दाणा भरला आहे. सुमारे ४ इंच लांबीची ओंबी असून ५० ते ६० दाणे भरले आहेत. यंदा गव्हाच्या पिकावर कसली ही रोगराई आली नाही. मार्चच्या पहिल्या आठवड्यात गहू काढणील येऊन एकरी १६ ते २० क्विंटल प्रमाणे उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा शेतकरी वर्ग व्यक्त करत आहेत.

# छगन भुजबळ यांच्या हस्ते लासलगाव पोलिस ठाण्याचे नूतन इमारतीचे लोकार्पण

### पोलीस वसाहतीचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार; पोलीस विभागाने तातडीने प्रस्ताव सादर करावा - छगन भुजबळ



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** लासलगाव पोलिस ठाणे अंतर्गत येणाऱ्या परिसराचा विस्तार बघता आगामी काळात पोलिस ठाण्याची एपीआयची पोस्ट पीआयमध्ये दर्जोन्नत करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्यामुळे येथील पदे देखील वाढणार आहे. त्याचबरोबर पोलीस वसाहतीच्या प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे. त्यासाठी पोलीस विभागाने तातडीने प्रस्ताव सादर करावा अशा सूचना राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना दिल्या.

महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या.मुंबई यांच्या निधीतून साकारण्यात आलेल्या लासलगाव पोलिस ठाण्याच्या नूतन इमारतीचे लोकार्पण छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी माजी आमदार कल्याणराव पाटील, पोलिस अधिक्षक विक्रम देशमाने, अधीक्षक अभियंता सपना कोळी, पोलीस उपअधीक्षक निलेश पालवे, सहायक पोलिस निरिक्षक भास्कर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक पवन सुपणार, श्री. वाळके, येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, भाऊसाहेब भवर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर जगताप, जयदत्त होळकर, डॉ.श्रीकांत आवारे, सरपंच योगिता पाटील, रामनाथ शेजवळ, अनिता ब्रम्हेचा, मंगेश गवळी, धर्मेश जाधव, मच्छिंद्र थोरात, बाळासाहेब पुंड, सचिन दरेकर, अफजल शेख, शिवाजी सुपनर, संतोष राजोळे, पांडुरंग राऊत, कंत्राटदार प्रशांत सारडा, आर्किटेक्ट जयंत कोलते यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ म्हणाले की, लासलगाव परिसराचा वाढता विस्तार आणि कामकाज सुलभ व्हावे यासाठी लासलगाव पोलिस स्टेशनच्या इमारतीसाठी सुमारे ४.५० कोटी रूपये खर्च करून आज अद्ययावत सोई सुविधा असलेली सुसज्ज नूतन इमारत उभारण्यात आलेली आहे.भविष्यातील वाढणारी पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेता पोलिस वर्गाला काम करण्यासाठी ही इमारत अतिशय सोईची ठरणार आहे. लासलगाव येथे आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ असल्याने याठिकाणी दिवसभर शेतकरी वर्गाची मोठी वर्दळ असते. तसेच मोठी आर्थिक उलाढाल याठिकाणी होत असते. त्यामुळे येथे कुठलाही गैरप्रकार होणार नाही यासाठी पोलिस यंत्रणेने तितकेच सतर्क राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.ते म्हणाले की, विस्तारत असलेल्या या शहरात कायदा व सुव्यवस्था कशी राखली जाईल याकडे देखील पोलिसांनी विशेष लक्ष द्यावे. लासलगाव पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या परिसराचा विस्तार बघता आगामी काळात पोलिस स्टेशनची एपीआयची पोस्ट पीआय मध्ये दर्जोन्नत करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्यामुळे येथील पदे वाढणार आहे. तसेच पोलिस अधिकारी व कर्मचारी वसहतीचा प्रश्न मार्गी लाऊन सुसज्ज पोलिस निवासस्थाने निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. यासाठी आपण नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. त्यांनी तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहे. त्यामुळे लवकरच हा प्रश्न देखील मार्गी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, लासलगाव परिसराचा वाढता विस्तार बघता अनेक विकासाची कामे आपण याठिकाणी हाती घेतली आहे. लासलगाव बस स्थानक, लासलगाव विंचुर रस्ता चौपदरीकरण, बाह्य वळण रस्ता, शिवनदीवरील पाटोदा रस्त्याला जोडणारा पूल, उपजिल्हा रुग्णालय बांधकाम यासह अनेक महत्वाची कामे आपण हाती घेतली आहे. अप्पर तहसील कार्यालय तयार करण्यासाठी आपला पाठपुरावा सुरू असून येणाऱ्या काळात मंत्री असो किंवा नसो कुठल्याही निधीची कमतरता पडणार नसून लासलगाव परिसरात ही जास्तीत जास्त विकासाची कामे मार्गी लावली जातील असे त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, लासलगाव शहराच्या सुरक्षेसाठी अग्निशामक यंत्रासाठी ९० लक्ष रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामासाठी तातडीने प्रस्ताव सादर करण्यात यावा अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी माजी आमदार कल्याणराव पाटील, ग्रामीण पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अधीक्षक अभियंता सपना कोळी, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर जगताप, जयदत्त होळकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# समृद्ध महाराष्ट्रासाठी राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय

### शिव पानंद शेत रस्त्यांना निधी कमी पडून देणार नाही - उपमुख्यमंत्री पवार



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१२, सुपा (अ.नगर) :** जिल्हा तालुका प्रशासनासोबत ग्रामप्रशासनाची जबाबदारी महत्वाची-शरद पवळे/ दादासाहेब जंगले पाटील (शिव पानंद शेतरस्ता चळवळ महाराष्ट्र राज्य) शेतकरी समृद्ध झाला तर महाराष्ट्र समृद्ध होईल.

या उद्देशाने महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून शेत तिथे रस्त्यांसाठी राज्यभर शासन निर्णयासह, हायकोर्टाच्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी राज्यभर जनजागृती जन आंदोलनाच्या माध्यमातुन प्रशासणाचे, सरकारचे लक्ष वेधण्यासाठी लढा सुरू केला असता राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी राज्यातील शेत रस्त्यांच्या प्रश्नासंदर्भात दिलेल्या निवेदनाची दखल घेतल्याबद्दल चळवळीच्या वतीने आभार मानन्यात आले. पुन्हा नव्याने घेतलेल्या भेटी दरम्यान उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शिव पानंद शेतरस्त्यांना निधी कमी पडू देणार नाही. असे आश्वासन दिले.

तसेच राज्यातील सर्वच शिव पाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामे दर्जेदाररीत्या पूर्ण करा. अशी सूचना प्रशासनाला देत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर महसूल प्रशासनामार्फत फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असे स्पष्ट आदेश दिले. तसेच ग्रामस्तरीय शेत रस्ता समिती स्थापन करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

रस्त्यांचे काम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी. शिव पाणंद शेत रस्त्यांबाबत प्रलंबित असलेली प्रकरणे एका महिन्यात निकाली काढावीत शिव पाणंद रस्ते, शेत रस्ते, सार्वजनिक वहीवाटीच्या रस्त्यांच्या मोजणी आणि पोलीस संरक्षणासाठी असलेली फी बंदच्या अंमलबजावनीच्या मागणीची दखल महसूल मंत्री बावनकुळे यांनी घेत रस्त्यांच्या नंबरीं सर्वेक्षण करुन नंबरीं हटवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. शेत रस्त्यांच्या प्रकरणी तहसीलदारांच्या निर्णयावर उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अपील केल्यानंतर त्यांनीच अंतिम निकाल देण्याबाबत शासन सकारात्मक असून शेत रस्त्यांचा उल्लेख झाल्याशिवाय वाटप पत्र मंजूर करू नये.

अशा चळवळीच्या विविध मागण्यांचा विचार राज्य सरकारकडून करण्यात आल्यामुळे जिल्हा तालुका प्रशासणासोबत ग्राम प्रशासनाची जबाबदारी वाढली असून शेतकऱ्यांसोबत नागरिकांनी दर्जेदार शेतरस्ते करून घेण्यासाठी पुढाकार घ्यावा. असे महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेत रस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

# मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये डबल धमाका; मयांकला सुवर्ण, सौरभला कांस्य






**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, उत्तराखंड :** राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये महाराष्ट्राने सलग तिसर्या दिवशी ही सुवर्णयशाची धडाकेबाज कामगिरी केली. टेट्रार्थलॉनच्या वैयक्तिक प्रकारात मयांक चाफेकरने सुवर्णपदकाची बाजी मारली. पाठोपाठ सांघिक गटात ही महाराष्ट्रानेअव्वल स्थान पटकावले. वैयक्तिक प्रकारातील कांस्यपदकही महाराष्ट्राच्या सौरभ पाटीलने जिंकले.

गौलापार येथे सुरू असलेल्या मॉडर्न पेंटॅथलॉनमध्ये सलग तिसर्या दिवशीही महाराष्ट्राचा जयजयकार दुमदुमला. टेट्रार्थलॉन प्रकारात ठाणेच्या मयांक चाफेकरने ११२६ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकावर नाव कोरले. हरियाणाच्या बसंत तोमरने १०७६ गुणांसह रौप्य पदक तर जिंकले तर महाराष्ट्राच्या सौरभ पाटीलने १०६५ गुणांची कमाई करीत कांस्यपदक ही जिंकले. २०० मीटर जलतरण, तलवारबाजी, १६०० मीटर धावणे, लेझर नेमबाजी व ६०० मीटर धावणे असा हा दमछाक व कौशल्यपूर्ण प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी दुसर्यांदा सुवर्णपदक पटकवले. गोवा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ही महाराष्ट्राने पदकांची लयलूट केली होती.

टेट्रार्थलॉन सांघिक प्रकारातही महाराष्ट्राचा संघ अव्वल राहिला. मराठामोळे क्रीडापटू मयांक चाफेकर, सौरभ पाटील व पुण्याचा जय लवटे त्रिमूर्तींनी ३१७९ गुणांची कमाई करीत सुवर्ण पदकाला गवसणी घातली. रौप्यपदक गोवा तर कांस्य पदक हरियाणा संघाला मिळाले. मयांक व सौरभचे हे स्पर्धेतील सलग तिसरे पदक आहे. ट्रायथले शर्यततीत मयांकने कांस्य पदक तर कोल्हापूरच्या सौरभ पाटीलने बायथले प्रकारात रूपेरी यश संपादन केले होते. पदक विजेत्या संघाला शेखर खासनीस व घनश्याम कुवर, आहिल्या चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्राचे उपपथक प्रमुख सुनील पूर्णपात्रे व आंतरराष्ट्रीय खेळाडू विरज परदेशी यांनी हस्ते विजेत्यांना पदके बहाल करण्यात आली.

# धोंडीबा (बाबा) रांधवण यांचे निधन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथील जुन्या पिढीतील धोंडीबा किसन रांधवण यांचे सोमवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी धोंडीबा रांधवण यांचे ७८ वय होते. टाकळी ढोकेश्वर व परिसरात बाबा माळी या नावाने ते परिचित होते. एकत्रीत किसन रांधवण कुटुंबातील पाच भावांपैकी ते सर्वात थोरले होते. त्यांच्या पश्चात पत्नी. दोन मुले, एक मुलगी, जावई, दोन सुना, चार भाऊ, दोन बहिणी, पूतणे असा मोठा परिवार आहे. ओम कॉम्प्युटर चे संचालक ग्रामपंचायत सदस्य बापूसाहेब रांधवण व ओबीसी सेलचे पारनेर तालुका उपाध्यक्ष मळिभाऊ रांधवण यांचे ते वडील होत. दैनिक अक्षराजचे पत्रकार वसंत रांधवण यांचे ते चुलते होते. त्यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबीयांवर व परिसरात शोककळा पसरली असून धोंडीबा रांधवण यांच्या अकाली जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी टाकळी ढोकेश्वर येथे होणार आहे.

